**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १६७२/२००८**

**१) श्री संजय रमेशलाल अग्रवाल**
**रा.कंवर नगर, केडीया आईस फॅक्टरी समोर**
**रामकृष्ण टॉकीज रोड, अकोला, ता.जि. अकोला.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.अकोला**
**विद्युत भवन रतनलाल प्लॉट अकोला.**

**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (सं.व सु)(शहर विभाग)**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. अकोला,**
**विद्युत भवन, अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक ९.६.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.११.२००६ रोजी शासकिय माहिती अधिकारी तथा मुख्य अभियंता (राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या छायांकित प्रतीप्रमाणे) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. यांचेकडे दाखल केलेल्या अर्जावर जिल्हा परिषद कार्यालय, अकोला असा पत्ता दिलेला आहे. सदरच्या अर्जाच्या संदर्भात जोडलेल्या पत्रात मागितलेली १ ते ६ क्रमांकाची माहिती जजिस्टर टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

" मी अर्जदार आपणास कळवितो ते येणे प्रमाणे-

मी अकोला येथील रहिवाशी असून भ्रष्टाचार विरोधी मंच (अखिल भारतीय) या राष्ट्रीय स्तरची संस्थेच्या अकोला शहराचा युवा शहर अध्यक्ष आहे. मी नेहमी समाज कार्य व भ्रष्टाचार विरोधी कार्य लोकहित करीता करीत असतो. नियम व कायद्यांचे होत असलेले उल्लंघन आणि उच्च

अधिका-यांना उल्लंघन बाबत सर्व माहित असूनही त्याकडे दुर्लक्ष करतात आणि भ्रष्टाचार याबाबत मी आपणास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज देवून खालील माहिती व कागदपत्रे मागत आहे. तरी माझा अर्ज ग्राहय धरुन मला खालील माहिती व कागदपत्रे पुरविण्यात यावे.

(१) विद्युत देयकात वापरलेले विद्युत बाबतची रक्कम, समायोजीत रक्कम आणि व्याव इत्यादि लावलेले असल्यावर सदरचे देयकचा भरणा करण्याकरीता दिलेल्या शेवटच्या तारखेच्या अगोदर आपण ग्राहकांना विद्युत पुरवठा खंडीत करु शकता काय. तसेच थकीत बिलाच्या कारणाने विद्युत पुरवठा खंडीत केल्यास ग्राहकाचे विद्युत मिटर व सर्व्हिस लाईन काढून घेता येते काय. याचे उत्तर होय असेल तर कायद्याच्या कोणत्या तरतुदीनुसार विद्युत पुरवठा खंडीत करुन विद्युत मिटर काढून घेता येते  याबाबत माहिती द्यावी.

(२) आपल्या अधिकार क्षेत्रातील उपविभाग क्रं. ३ अंतर्गत रामनगर अकोला येथील सत्यनारायण गौरीशंकर अग्रवाल यांच्याकडे वीज चोरी पकडण्यात आली होती. याबाबत आपल्या विभागाकडून त्यांचे विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली, त्यांना कोणत्या आधारे व किती रुपयाचे विद्युत देयक देण्यात आले. दंड किती बसविण्यात आले. त्यांचा विद्युत वापर कोणतया प्रकारचा होता. वीज चोरी पोलीसात तक्रार नोंदली आहे काय. सहरहू ग्राहकाने आपल्याकडे याबाबतीत रक्कम भरली आहेत काय. तर ती रक्कम भरली असे या ग्राहका बाबत वीज चोरी संबंधीत पूर्ण माहिती पुरविण्यात यावी.

(३) आपल्या अधिकार क्षेत्रातील म.रा.वि.वि.कं.म.शहर विभाग अकोला चे उपविभाग क्रं. ३ च्या कार्यक्षेत्रातील किती ग्राहकांवर तीन महिन्याहून जास्त काळाचे वीज देयक थकीत आहे त्याची थकीत रक्क्मेसह यादी द्यावी. त्यापैकी किती ग्राहकांवर कारवाई करण्यात आली. याबाबत सर्व ग्राहकांचे नाव व पत्यासह माहिती द्यावी. अशा ग्राहकांपैकी किती ग्राहकांचे वीज देयक थकीत असल्याबाबत वीज पुरवठा खंडीत करुन मिटर काढून घेण्यात आले आहेत व त्यापैकी किती ग्राहकांनी रक्कम भरुन मिटर जोडून घेतले आहे याबाबत ग्राहकांचे नाव व पत्यासह माहिती द्यावी.

(४) आपल्या विभागाकडून ज ग्राहकाची वीज चोरी पकडण्यात आली तर आपण त्यांच्या विरुध्द कोणकोणती कारवाई करतात याबाबत विस्तृत माहिती द्यावी. जर विद्युत चोरी पकडल्या गेली आणि ग्राहकाने आपण दिलेले देयक नुसार रक्कम भरली नाही तर त्याचा विद्युत पुरवठा पुन्हा सुरु करुन देता काय. आपल्या विभागाद्वारे ग्राहकाकडे वीज चोरी पकडल्यावरही आपण दिलेले देयकाची पूर्ण रक्कम न भरल्यावरही आपण त्या ग्राहकाचा विद्युत पुरवठा सुरु ठेवला आहे काय. असल्यास अशा ग्राहकांचे नाव व पत्यासह माहिती द्यावी.

(५) आपल्या अधिकार क्षे९ातील म.रा.वि.वि.कं.म.शहर विभाग अकोला चे उपविभाग क्रं. ३ च्या कार्यक्षेत्रातील मागील २ वर्षात किती ग्राहकांवर थकीत रक्कमेबाबत कारवाई करण्यात आली व किती रक्कम वसुल करण्यात आली तसेच किती ग्राहकांची वीज चोरी पकडण्यात आली व त्यापैकी किती ग्राहकांवर पोलीस कारवाई करण्यात आली व किती ग्राहकांकडून देयका प्रमाणे रक्कम वसुल करण्यात आली याबाबतची संपूर्ण माहिती द्यावी.

(६) आपल्या विभागाने वीज चोरी बाबत केलेली कारवाई अंतर्गत उघडकीस आलेल्या पकडण्याची एकुण संख्या, चोरी केलेल्या वीजेची एकुण रक्कम व त्यापैकी वसुल केलेली रक्कम, वसुल केलेली दंडाजी रक्कम आणि फोजदारी केलेल्या प्रकरणाची संख्या व त्यांची सद्यस्थिती बाबत पूर्ण माहिती द्यावी.

वर मागितलेली माहिती आपण मला लवकरात लवकर द्यावी. सदर माहिती देण्याकरीता आपणास माझ्याकडून सरकारी भरणा भरुन घ्यावयाचे असल्यास आपण मला त्या बाबत सूचित केल्यास मी ते त्वरीत भरण्यास तयार आहे. तरी सदरची माहिती देण्याची कृपा करावी. "

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१.२००७ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनूषंगाने विहित मुदतीत माहिती कां उपलब्ध करुन दिली नाही याबध्दल जन माहिती अधिकारी यांना खुलासा दाखल केला आहे.

" **खुलासा**

| | | |
|---|---|---|
| २ | अर्ज दूस-या प्राधिकरणाशी संबंधित असेल तर तो अर्ज संबंधित प्राधिकरणाकडे पाठविल्याची तारीख व पुरावा व त्याप्रमाणे अर्जदारास अवगत केल्याचा दिनाक | मुख्य अभियंता अ.प.म.अकोला हयांचे पत्र क्रं.१४१२ दि.०५.१२.०६ अन्वये कार्यकारी अभियंता श.वि.अकोला हयांच्याकडे पाइविला. का.अ.श.वि.अकोला हयांनी सहरहू अर्ज हा उपविभाग २ हयांना अग्रेशित केला. अर्जातील मागितलेली माहिती ही उपविभाग क्रं. ३ हयांचेशी संबंधीत असल्याने उपविभाग क्रं.२ हयांनी सदरहू अर्ज उपविभाग ३ ला पाठविला व तो उपविभाग क्रं. ३ ला २९.१२.०६ रोजी प्राप्त झाला. |
| ३ | अर्जदाराने मागितलेल्या माहितीचा तपशिल | म.रा.वि.वि.कंपनी चे शहर विभागाच्या उपविभाग क्रं.३ च्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांचे विज देयक थकित रक्कम वि. पुरवठा खंडीत करणे, वि.मिटर काढून नेणे, विज चोरी व त्याबाबत केलेली कार्यवाही तसेच अर्जा सोबत जोडलेल्या पत्रानुसार एकुण ६ मुदयांवर विशेषत: सत्यनारायण गौरीशंकर अग्रवाल यांचे येथील विज चोरी बाबतची तसेच मागिल दोन वर्षाचे कालावधीत उपविभाग क्रं. ३ चे कार्यक्षे९ातील किती ग्राहकांची विज चोरी पकडण्यात आली, त्यांचेवर केलेली पोलीस कार्यवाही, वसुल केलेली दंडाची रक्कम व फोजदारी प्रकरणे दाखल केलेल्या प्रकरणाची संख्या व प्रकरणाची स्थितीत अशा प्रकारची विस्तृत माहिती मागितली होती. |
| ४ | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक व पुरावा | अर्जदाराने त्याचा उपविभाग क्रं.३ बाबतची माहिती मिळण्याचा अर्ज हा मुख्य अभियंता अमरावती प.मं.अकोला हयांच्या कडे सादर केला होता तो अर्ज |

| | | |
|---|---|---|
| | | दि. २९.१२.०६ रोजी प्राप्त झाल्यानंतर अर्जातील आवश्यक ती माहिती ही उपविभाग क्रं. ३ चे असलेले चार केंद्राचे अंतर्गत व शहर विभागाचे संगणक कक्षाशी जमा करणे आवश्यक असल्याने अर्जदारास उपविभाग क्रं. ३ चे माहिती अधिकारी यांनी पत्र क्रं. १८५ दि.२३.१.०७ रोजी मुदत वाढी करिता सूचित केले होते. सदरहू माहिती संकलीत झाल्यानंतर त्या बाबतचे खर्चाची मागणी अर्जदारास पत्र क्रं.२६२ दि.२.२.०७ अन्वये करण्यात आली होती परंतु रकमेचा भरणा अर्जदाराने अद्यापही केला नाही. |
| ५. | अपीली अधिका-याकडे अपील केले असल्याचा त्याचा दिनांक आणि ठिकाण | अर्जदाराचा माहितीच्या अधिकाराचा अर्ज हा प्रलंबित असताना अर्जदाराने दि.१८.१.०७ रोजी मुख्य अभियंता अमरावती परिमंडळ अकोला येथे १८.१.०७ रोजी अपील सादर केले. सदरहू अपील हे मुख्य अभियंता अ.प.मं.अकोला हयांच्या कडे चुकीने सादर केले असल्यामुळै त्यांनी सदरहू अपील का.अभि.श.वि.अकोला हयांना संबंधित उपविभागाचे अपीलीय अधिकारी हयांचेकडे पाठविण्या करीता निर्गमित केले व तशी सूचना मु.अभियंता अ.म.प.अकोला हयांनी अपीलार्थीस आपले पत्र क्रं.५०७ दि.२२.१.०७ ने सूचित केले. सदरहू अपील हे का.अभि.हयांनी श.उप.वि.क्र.३ चे उप कार्यकारी अभियंता हयांना पुढील आदेशा करीता आपले पत्र क्रं.४४४ दि.२५.१.०७ नुसार पाठविले. |
| ६ | ज्या आदेशाविरुध्द अपील केले त्या आदेशाची सांक्षाकित प्रत | |

| | | |
|---|---|---|
| | सोबत जोउली आहे | |
| ७ | अपील करण्याचे प्रयोजन | माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत आदेश पारित केला नाही म्हणून |
| ८ | अपीलीय अधिका-याकडे करण्यात आलेल्या पहिल्या अपीलाचा निर्णय व दिनांक | उप.का.अभि.श.उपविभाग क्रं. ३ तथा अपीलीय अधिकारी यांनी आपले पत्र क्रं.०३/२६३ दि.२.२.०७ अन्वये अपीलार्थीला अपीलाचे आदेशाबाबत सूचित केले. |
| ९ | अर्जदारास निर्णय प्राप्त झाल्याची तारीख. | |

उत्तरवादी क्रं. १ व २ चे अनुषंगाने खुलासा :-

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे शहर विभागाअंतर्गत तीन उपविभाग केले आहे. तीन उपविभागा अंतर्गत पुन्हा ग्राहकांना सुविधा पुरविण्या करीता केंद्राची निर्मिती करण्यात आलेली आहे. अकोला शहर विभागा अंतर्गत उपविभाग क्रं. ३ चे अधिनस्थ चार केंद्र असून घरगुती वर्गवारीचे २८२८० ग्राहक औघोगिक वर्गवारीचे ४५४२ व वाणिज्य वर्गवारीचे २७२ ग्राहम असे एकुण ३३०९३ ग्राहक आहेत. उपविभाग क्रं. ३ अंतर्गत कनिष्ठ अभियंता हे माहिती अधिकारी म्हणून नेमलेले असून उपविभाग क्रं. ३ उप कार्यकारी अभियंता हे माहितीच्या अधिकारा करिता अपीलीय अधिकारी म्हणून नेमलेले आहेत.

अपीलार्थीने दिनांक २.१२.२००६ रोजी अकोला शहरचे अंतर्गत असलेले उपविभाग क्रं. ३ येथील ग्राहकां बाबतची सन २००४ ते २.१२.०६ पर्यंतची विस्तृत माहिती मागितली हाती. सदरहू अर्जा अंतर्गत अपीलार्थीने माहिती ग्राहकांचे विज देय, थकीत रक्कम, वि. पुरवठा खंडीत करणे, वि.मिटर काढून नेणे, विज चोरी व त्या बाबत केलेली कार्यवाही तसेच अर्जा सोबत जोउलेल्या पत्रानुसार एकुण ६ मुद्यांवर विशेषत सत्यनारायण गौरीशंकर अग्रवाल यांचे येथील वीज चोरी बाबतची तसेच मागिल दोन वर्षाचे कालावधीत उपविभाग क्रं. ३ चे कार्यक्षेत्रातील किती ग्राहकांची वीज चोरी पकडण्यात आली. त्यांचेवर केलेली पोलीस कार्यवाही, वसुल केलेली दंडाची रक्कम व फोजदारी प्रकरणे दाखल केलेल्या प्रकरणाची संख्या व प्रकरणाची स्थितीत अशा प्रकारची विस्त,त माहिती मागितली होती.

अपीलार्थीचा अर्ज हा मुख्य अभियंता यांचे कडून कार्यालयीन प्रथेनुसार कार्यकारी अभियंता शहर विभाग हयांच्या कडे पाइविण्यात आला होता. कार्यकारी अभियंता शहर विभाग अकोला हयांचे कडून अर्जदाराच्या निवासाच्या पत्यामुळे नजरचुकीने सदरहू अर्ज उपविभाग क्रं. २ हयांना पाठविल्या गेला. अपीलार्थीचे अर्जातील माहिती ही उपविभाग क्रं. ३ शी संबेधीत असल्याने उपविभाग क्रं. २ ने सदरहू अर्ज उपविभाग क्रं. ३ ला पाठविला.

अपीलार्थीचा माहिती मिळण्याचा अर्ज दि. २९.१२.२००६ रोजी उपविभाग क्रं. ३ चे माहिती अधिका-यांना प्राप्त झाल्यावर त्यांनी अपीलार्थीचे अर्जातील माहित ही विस्तृत स्वरुपाची असून ती वेगवेगळया केंद्रा मार्फत संकलीत करणे आवश्यक होते व अर्जातील श्री सत्यनारायण गौरीशंकर अग्रवाल हयांच्या विज चोरी बाबतची माहिती ही प्रकरण न्या प्रविष्ठ असल्याने त्या बाबतची माहिती देता येणे शक्य नाही असे आपले पत्र क्रं.१८५ दि. २३.१.२००७ रोजी अपीलार्थीला त्याचे अर्जातील माहिती पुरविण्या करीता मुदत वाढ करण्याबाबत सूचीत केले.

तसेच अपीलार्थीला आवश्यक असलेली थकबाकी बाबतची माहिती त्याबाबत केलेली कार्यवाही, वीज चोरी, त्यावर करण्यात आलेली आकारणीची वसुली, तडजोउ रक्कम व वीज चोरी बाबत केलेल्या फोजदारी प्रकरणांची माहिती ही संकलीत करुन त्या बाबत लागणा-या खर्चाची माहिती अपीलार्थी कडून माहिती अधिकारी यांनी आपले पत्र क्रं.२६२, दि.२.२.०७ अन्वये अपीलार्थी ला केली होती.

माहिती पुरविण्या करीता आवश्यक त्या खर्चाचा भरणा प्रलंबित असतांनाच अपीलार्थीने मुख्य अभियंता अमरावती परिमंडळ अकोला हयांचे कडे दिनांक १८ जानेवारी २००७ रोजी आदेश पारित केला नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले होते. सदरहू अपील हे मुख्य अभियंता अमरावती परिमंडळ अकोला हयांच्या कडे चालू शकत नसल्याने त्यांनी सदरहू अपील कार्यकारी अभियंता शहर विभाग हयांच्या कडे संबंधीत अपीलीय अधिकारी यांच्या कडे निर्णया करीता पाठविण्यात आले.

कार्यालयीन पध्दतीनुसार सदरहू अपील उपकार्यकारी अभियंता शहर विभाग क्रं. ३ अकोला हयांचे कडे दिनांक २५.१.२००७ रोजी प्राप्त झाले. तयावेळी शहर उपविभाग क्रं. ३ चे अंतर्गत असलेले माहिती अधिकारी हयांच्या कडे अपीलार्थीचा मुळ अर्ज हा माहिती पुरविण्या

करीता रकमेचा भरणा करण्या करीता प्रलंबित होते त्यामुळे अपीलीय अधिकारी उपकार्यकारी अभियंता शहर विभाग क्रं. ३ हयांनी आदेश पारीत करुन आपले पत्र क्रं. २६३ दि. २.२.०७ अन्वये अपीलार्थीस सूचित केले.

त्यानंतर अपीलार्थीने दिनांक ७.२.२००७ रोजी माहिती अधिकारी यांनी मागणी कलेली रक्कम ही चुकीच्या दराने मागणी केली असल्याबाबत पत्र दिले. तसेच दि. ८.२.२००७ रोजी अपीलार्थीस दिलेले २३.१.०७ चे पत्रान्वये मुदवाढीची मागणी नाकारीत असल्या बाबतचे ही पत्र देवून सूचित केले. दोन्ही पत्रा मध्ये अपीलार्थीने त्याचा माहितीचा अर्ज व अपील हे चुकीच्या अधिका-याकडे सादर केले होते ही बाब स्पष्ट होते. अपीलार्थीस उत्तरवादी हे माहिती देण्यास तेव्हांही तयार होते व आताही तयार आहेत. परंतु माहिती करीता आवश्यक त्या रकमेचा भरणा न केल्याने उत्तरवादी त्यास माहिती पुरवू शकले नाही. माहिती न पुरविण्यामध्ये उत्तरवादीचा कोणताही हेतू नव्हता. अपीलार्थीच्या अपीलामध्ये कोणताही कायदेशिर मुद्या नाही. सबब अपील खारीज करण्यात यावे, ही विनंती."

सदरचा अर्ज हा जन माहिती अधिकारी यांना दिनांक २९.१२.२००६ रोजी प्राप्त झाला असे त्यांचे म्हणणे आहे. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचा माहितीचा अर्ज हा मुख्य अभियंता यांचे कार्यालयात गेलेला असल्यामुळे व माहिती शहर उपविभाग क्रमांक ३ येथील असल्यामुळे सदरचा अर्ज हा माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक २९.१२.२००६ ला प्राप्त झाला. व त्यानंतर सदरचे अर्जामध्ये त्रयस्थ पक्षाची माहिती मागितलेली असल्यामुळे त्रयस्थ पक्षाला सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबध्दल विचारणा करण्यात आली. तसेच अकोला शहर विभागाअंतर्गत उपविभाग क्रमांक ३ चे अधिनस्त ४ केंद्र असून घरगुती वर्गवारीचे २८२८० ग्राहक औद्योगिक वर्गवारीचे ४५४२ ग्राहक व वाणिज्य वर्गवारीचे २७१ ग्राहक असे एकुण ३३०९३ ग्राहम असल्यामुळे उपविभाग क्रमांक ३ अंतर्गत कनिष्ठ अभियंता हे माहिती अधिकारी म्हणून नेमलेले असून उपविभाग क्रं. ३ उपकार्यकारी अभियंता हे माहितीच्या अधिकाराकरीता अपीलीय अधिकारी म्हणून नेमलेले आहेत. तसेच ही माहिती विस्तृत असल्याचे सुध्दा त्यांनी खुलाशात म्हटलेले आहे. तसेच नजरचुकीने अर्ज

उपविभाग क्रमांक २ यांचेकडे पाठविला गेला असेही म्हटलेले आहे. सदरची माहिती वेगवेगळया केंद्राकडून संकलीत करणे आवश्यक होते. श्री सत्यनारायण गौरीशंकर अग्रवाल यांचे विज चोरीची माहिती प्रकरण न्यायप्रविष्ट होते व त्याकरीता त्यांना दिनांक २३.१.२००७ रोजी मुदतवाढ देण्याकरीता विचारले. त्यानंतरही अपीलकर्ता यांना दिनांक ५.१२.२००६ रोजी माहिती अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता (सं व सु) विभाग यांचेकडे पत्र पाठविल्याची प्रत दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक २२.१२.२००६ रोजी कार्यकारी अभियंता, अकोला शहर विभाग यांना कार्यकारी अभियंता,शहर उपविभाग क्रमांक २ ला पत्र पाठविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २८.१२.२००६ रोजी उप कार्यकारी अभियंता शहर उपविभाग यांनी कार्यकारी अभियंता यांना सदरच्या अर्जातील माहिती उपविभागीय कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे कार्यकारी अभियंता शहर विभाग, अकोला यांना कळविले. दिनांक ५.१.२००७ रोजी उप कार्यकारी अभियंता यांनी श्री सत्यनारायण गौरीशंकर अग्रवाल यांना वरील विषयाचे अनुषंगाने श्री संजय अग्रवाल रा.कवरनगर, अकोला यांनी आपल्या विरुध्द करण्यात आलेल्या विज चोरीच्या कार्यवाहीची विस्तृत माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये मागितली आहे. याबाबत माहिती  देण्यात यावी किंवा नाही या संबंधी लेखी निवेदन १० दिवसांचे आंत या कार्यालयास कळविण्यात यावे, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर उप कार्यकारी अभियंता कार्यालय क्रमांक ३ यांनी प्रणाली विश्लेषक यांना दिनांक २.१.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २३.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांना दिनांक २७.२.२००७ पर्यंत मुदत मागण्यात आली. विचारलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असून वेगवेगळया विभागातील व चारही वितरण केंद्रशी संबंधीत आहे. त्यामुळे ही माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता कालावधी लागू शकतो तसेच वीज चोरी संबंधीत मागितलेली माहिती ही न्यायप्रविष्ट प्रकरणाशी संबंधीत असल्यामुळे देता येणे शक्य नाही. तरी आपल्या उर्वरित माहिती करीता दिनांक २७.२.२००७ पर्यंत मुदत मागविण्यातयेत आहे, असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २.२.२००७ रोजी अपीलकर्ता यांना एकुण पृष्ठये २४२

असून प्रती पेज १० रुपये प्रमाणे एकुण रुपये २४२०/- भरणा करण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००७ रोजी मागितेल्या खर्चाची रक्कम ही अवाजवी असून माहिती रुपये २ प्रतीप्रमाणे उपलब्ध करुन देणे नियमाप्रमाणे आहे असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक ८.२.२००७ रेजी अपीलकर्ता यांनी उपकार्यकारी अभियंता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी मुदत वाढविण्याची केलेली विनंती मान्य करता येत नाही असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी सुध्दा दिनांक १८.१.२००७ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परिमंडळातील माहिती अधिकारी यांनी शहर विभागातील कार्यकारी अभियंता तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. व त्यानुसार दिनांक २५.१.२००७ ला कार्यकारी अभियंता यांनी उप कार्यकारी अभियंता शहर उपविभाग यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. अंतिमतः दिनांक १२.२.२००७ रोजी माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता विद्युत केंद्र क्रमांक ५ उपविभागीय कार्यालय क्रमांक ३ यांनी अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाद्वारे माहिती पाठविण्याचा खर्च रुपये ३००:- व आपणास देण्यात आलेल्या डिमांड नोटचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. त्याही पत्रामध्ये आपण उपविभाग क्रमांक ३ च्या क्षेत्रातील विज ग्राहकाचे विज देयक थकीत रक्कम विद्युत मिटर काढून घेणे, वीज चोरी व त्याबाबत करण्यात आलेली कार्यवाही इ. विस्तृत स्वरुपाची माहिती मागितलेली होती. सदरचा अर्ज या कार्यालयास माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, वितरण केंद्र क्रमांक ५, उपविभाग कार्यालय उपविभाग क्रमांक ३ येथे न देता मुख्य अभियंता, अमरावती यांचे कार्यालयात सादर केले. सदर्हु अर्ज या कार्यालयात दिनांक २९.१२.२००६ रोजी वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त झाला याबाबतची माहिती तथा आपणाकडून मागविण्यात आलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची व वेगवेगळया विभागाशी संबंधीत तथा या विभागाच्या चारही वितरण केंद्राशी संबंधीत असल्यामुळे आपणास संदर्भिय पत्र क्रमांक ३ नुसार दिनांक ७.२.२०७ प्रमाणे वेळा मागितला. तसेच मागण्यात आलेल्या माहितीच्या यादी बाबत भरणा करणे संबंधी संदर्भीय पत्र क्रमांक ४ नुसार विनंती करण्यात आली. नियमाप्रमाणे व या कार्यालयास अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांचे आंत माहिती तयार

करण्यास विलुब लागू शकतो याबाबत वेळ व तयार झालेली माहिती पुरविण्याकरीता माहितीचा अधिकार ( शुल्क व खर्चाचे नियमन) २००५ चे कलम २ (ब) नुसार प्रती पेजचे मुल्य निर्धारित करण्यात आले आहे. ही यादी माहिती व तंत्रज्ञान केंद्र महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. अकोला यांनी तयार केली असून प्रति पेजचे मुल्य सुध्दा त्यांच्या कडून निर्धारित करण्यात आले आहे. याबाबत आपला गैरसमज झाला असून माहिती देण्याचे टाळण्याचा कोणताही हेतू नाही असे कळविण्यात आल्याचे दिसून येते.

अपीलकर्ता यांचेतर्फे ॲड. श्री एच.एम.लाहोटी यांनी युक्तीवाद केला. अपीलकर्ता यांच्या माहिती मागण्याच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ज्या स्तरावर माहिती उपलब्ध नाही त्या स्तरावर त्यांनी माहिती मागितलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ५(१) प्रमाणे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणात प्रशासकिय कार्यवाहीच्या प्रमाणे त्या त्या स्तरावर माहिती अधिकारी नियुक्त करण्याची तरतूद आहे जेणेकरुन माहिती त्या माहिती अधिका-यास मागितल्यास ती ३० दिवसांत उपलब्ध होऊ शकेल. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झाला हे म्हणणे ग्राहय धरता येत नाही. व त्याबध्दलचे स्पष्टीकरण हे वर नमूद केलेले आहे. कोणत्याही अर्जदाराने माहिती ज्या माहिती अधिका-याकडे असेले त्याच माहिती अधिका-याकडे माहिती मागावयाची असते तरच त्या माहिती अधिका-यास विलंबाबाबत जबाबदार धरता यते. अधिनियमाचे कलम २० (१) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेशिवाय कोणत्याही अधिका-यास किंवा कर्मचा-यास जबाबदार धरता येत नाही व त्याकरीताच अर्जदार यांनी सुध्दा अर्ज करताना तो संबंधीत योग्य त्या माहिती अधिका-याकडे केला पाहिजे हे अपेक्षित आहे. माहितीचे स्वरुप याचा विचार केल्यास माहिती मोघम स्वरुपाची व विस्तृत स्वरुपाची आहे, असे दिसून येते. तसेच त्रयस्थ पक्षाची माहिती विचारलेली आहे व त्यामुळे अधिनियमाच्या कलम ११ (१) प्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबध्दल विचारणे आवयक असते. मात्र असे विचारल्यानंतर त्या अर्जाची प्रत ही अपीलकर्ता यांना देणे आवश्यक असते, ती माहिती अधिकारी यांनी दिलेली दिसून येत नाही. माहितीचा अर्ज हा जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांचे पर्यंत पोहचल्यानंतर त्या

माहितीची विस्तृतता लक्षात घेवून त्यांनी अपीलकर्ता यांना मुदत वाढवून देण्याची विनंती केलेली दिसून येते. परंतु, अशा प्रकारची मुदत वाढवून देण्याची तरतूद ही अधिनियमात नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांची जी माहिती मागितलेली असेल त्या माहितीच्या संदर्भामध्ये येणा-या खर्चाची माहिती त्यांना कळवायची व खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी अशा प्रकारची कार्यपध्दती अवलंबिल्यास मुदत वाढविण्याची विनंती करण्याचा प्रसंग येणार नाही. माहितीच्या खर्चाच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनीच त्यांच्या दिनांक १२.२.२००७ च्या अर्जामध्ये नमूद केलेले आहे. त्यामुळे पुन्हा त्यांना नियमाची माहिती करुन देण्याची आवश्यकता दिसून येत नाही. मात्र रुपये १० प्रमाणे त्यांनी जी माहिती मागितली होती त्या रकमेच्या संदर्भामध्ये त्यांचे असे म्हणणे आहे की, माहिती व तंत्रज्ञान विभागाने ही माहित तयार केली असल्यामुळे व त्यांनी रुपये १० निर्धारित केले असल्यामुळे तसे अपीलकर्ता यांना कळविले होते. माहितीचा खर्च कार्यालयास कितीही आला तरी ती २ रुपये प्रत प्रमाणे उपलब्ध करुन देण्याची नियमाप्रमाणे तरतूद आहे.

प्रथम अपीलीय अधिका-यांकडे प्रथम अपील आल्यानंतर त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय हा कारण मिमांसा देणारा द्यावयाचा असतो जेणेकरुन प्रथम अपीलीय अधिकारी हे त्याच कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी असल्यामुळे त्याच स्तरावर माहिती उपलब्ध होरु शकेल व अपीलकर्त्यांस राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता भासली नसती. एखाद्या प्रशासकिय पत्राप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी हे अधिनियमाच्या तरतूदीप्रमाणे अपेक्षित नाही. माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे हे जन माहिती अधिकारी यांना सुध्दा माहित असते. परंतु ती त्यांनी उपलब्ध करुन दिली नसेल तर प्रथम अपीलाची तरतूद आहे व त्याकरीता प्रशासकिय पत्र देवून फारसा कार्यभाग साध्य होत नाही. सदरच्या प्रकरणात सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे पत्र दिले आहे. परंतु सुनावणी घेतली असती तर हा संपुर्ण पत्रव्यवहार थांबून माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली असती. व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतूदीचे उल्लंघन केले आहे.

असे असले तरी संपुर्ण पत्रव्यवहार व अंतर्गत पत्रव्यवहार व माहितीचे विस्तृत स्वरुप व त्रयस्थ पक्षाची माहिती या सर्वांचा विचार केल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली आहे असा निष्कर्ष मात्र काढता येत नाही. विलंब निश्चित झालेला आहे व तो अपीलकर्ता यांच्या अर्ज करण्याच्या पध्दतीमुळे झालेला आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे दोषी धरता येत नाही. मात्र माहिती ही विलंबाने उपलब्ध होत असली तरी ती विना मुल्य उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २३.११.२००६ (२.१२.२००६) च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक ९.६.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**